(Marathi)

1033
9/91

1590

10

P

Navin Shivaji (alias) Nana Frari Powada.

Govt. of Bombay in Marathi 1890 Mar

## नवीन शिवाजी ( अथवा ) (2 copies)

# नाना फरारी पोवाडा

" नाना आला " नाना आला--पोलिस घाबरला

बोले नाना कोळी आला तो नाशिकवाडा



किंमत १ आणा

IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED.
10 NOV. 1930

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1590
Date 18.1.72
GOVT. OF INDIA

श्री. अ. ब. कोल्हटकर बी. ए. एल. एल. बी. कृत

## नवीन शिवाजी [ अथवा ]

# नाना फरारीचा पोवाडा.

चाल--[ धन्य शिवाजी तो रणगाजी ]

'नाना आला' नाना आला-पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला ॥ध्रु०॥
गरिबापुढें फार बडबडे ताव देइ मिशिला
आज जागच्या जागीं त्याचा दण्डुकाचि गळला
बापाला जो बाप न मानी आई न आईला
पहा कसा तो गोगलगाई सम आतां बनला
वाघावाणी डुरकत होता 'हुकूम डर' बोला
आज फाटलं विजार त्याची फेसहि तोंडाला

काय ' शिपाईदादा, ऐसा प्रकार कां घडला
दबकत बोले नाना आला तो नाशिकवाला ॥१॥
' नाना आला ' नाना आला-पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला
नानाकोळी, जमात भोळी, विकि लाकुड मोळी
किंवा धरुनी मच्छि मासळी कुटुम्ब सांभाळी
परी इंग्रजी कायदा तया छळि वेळोवेळीं
फारष्टाचे लचांड त्याला पाडित जंजाळीं
क्यं बे अन्धे क्यं नहि देखी तारांची जाळी
' अच्छा डालूं अभी जेलमें ' सबकी सब टोळी
शम्भर वर्षे असा इंग्रजी जुलम तया जाळी
दरेक अपुल्या झोंपडीमध्यें अश्रु पहा ढाळी
मुकुन्द कोळी सच्चा; त्याचा बच्चा, ह्या वेळीं
दण्ड थोपटुनि नाना आला कोळ्यांचावाली॥२॥
' नाना आला ' नाना आला-पोलीस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला

हिंसा कोणी करिल तयाची बंद करीन वाचा
ह्मण ' गांधिचा भक्त असे मी भुक्त अहिंसेचा
गांजिल कोणी गरिबाला जो खाइन त्या कच्चा
करिन तयाचा चट्टा मट्टा जणुं मिठभाकरिचा
महालकरि पैकीं पाटिल दादा मालक गांवाचा
फारेष्टाचा हापिसर येवो गर्व हरिन त्याचा
दीनांचा मी सखा सोयरा गोर गरीबांचा
मूर्तिमंत सैतान पातला तरि न डरायाचा
आला नाना करी सामना हरि ताठा तुमचा
काय मजपुढें पाड कुणाचा उभें राहण्याचा॥३॥
' नाना आला ' नाना आला—पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला
मारवाडि बहु करी लबाडी देइ अती धोका
कवडी कवडी माया जोडी रडवितसे लोका
घरांतली ही घूसचि समजा कीं काळा बोका
सावकारिही त्याची न्यारी लुटि सारा पैका

'धीनो पैसो' पैसोनो धी करि धनमल काका
फाल्गुण शिमगा फाग-चढावितो व्याज असें केका
लिही चोपड्या पोकळ खोट्या दुप्पट घे रोखा
चुके वायदा तरी आणितो टांच शील शिका
महामारि कां ये न अशांना कां न होई वाखा
मारि उपाशी मुलें बायका देई दुःख शोका
'नका घाबरू' नका घाबरूं हांक अशी ऐका
नाना आला काळ तयांचा कापाया नाका ॥ २॥
'नाना आला' नाना आला–पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहराही सुकला
कोणी ह्मणती तात्या टोपी पुनरपि अवतरला
कोणी ह्मणती तंट्या भिल्ल पुन्हां देह धरिला
कोणी ह्मणती फडके आला फडकत झेंड्याला
वासुदेव बळवंत कराया सर इंग्राजि किल्ला
कोणी ह्मणती झाशि वालिनें पुरुष जन्म धरिला
कोणी ह्मणती भाउ सदाशिव पानपतावरिला

कोणी ह्मणती राव उमाजी पुन्हां सजिव झाला
कोणी ह्मणती शिवरायचि हा उदयातें आला
सर्व ' बोलती नाना आला हा नाशिकवाला '
सद्दी सरली इंग्रजांचिही काळ अतां फिरला॥५॥
'नाना आला ' नाना आला-पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला
कथा आयका जवां मर्दहो या नव मर्दाची
फारेष्टाचा एक हाफिसर सर्व जनां जाची
जुलुम तयाचा सहन होईना कारकीर्द त्याची
काळि कुट्ट जाहली, सकाळिका पुरे वाट साची
नानाचा बहु जीव कळवळे ईश्वरासि याची
देई संधि मज उतरण्यासि या घमेण्ड नीचाची
वेळहि आली लवकरि त्याच्या इच्छा पूर्तीची
दौऱ्या वरती स्वारी निघाली त्या सुर वष्टाची
घोड्या वरती सवार झाला घे भाला बरची
पिस्तुलही तो अपुल्या आंतिल जाकिटांत खोंची

जंगलवाला जंगलांतली आड वाट वेंची
घोडा जाई इकडे तिकडे त्या सत्वर खेंची
नाना वरती रोष तयाचा निन्दा करि त्याची
म्हणे ' लुटारू चोर ' तयाच्या थूः थूः जिनगीची
इतक्यामध्यें नाना आला मुवंत त्या केंची !
फारिष्टावरि अरिष्ट लोटे करुं लागे चींची ॥ ६ ॥
' नाना आला ' नाना आला–पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला
दृष्टिस पडतां फारिष्टाचा उर्मट अधिकारी
नाना तयाच्या श्रीमुखांत तो दहा वेळ मारी
त्यासि विचारी कोण लुटारु कोण करी चोरीं !
गरिबांचा मी वाली नाना की तूं अधिकारी
पगार भत्ता खाउनि करितां हराम खोरि तरी
गरिबांना नाडोनि उकळितां लांच कुदळ खोरी
नेउनि येथिल लाकुड फांटा बान्धितसा कोटं
हवेले तुमच्या बापाचिच ही मत्ता काय खरी

गरिबां वरती भरतां खटले फुकट फौजदारी
करितां त्याच्या घरीं उन्हाळा जगतीं या न सरी
धिक धिक तुमचें जिणें पातकी वराल नरकपुरीं
पुण्यवान मी असें तुह्मांहुनि नाना सर्वपरी
'नाना आला' इंग्रजांसही सवाल आज करी
राज्य घेतलें लबाडिनें कीं मारुनि तरवारी॥७॥
'नाना आला' नाना आला–पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला
वदा चोर क्लाइव्ह किंवा तो शिव छत्रपति
वदा चोर तो हेस्टिंग्जचि कीं शिन्दे प्राज्ञ अति
वदा चोर तो वेलस्ली कीं बापु वीरकीर्ति
वदा चोर तो डलहौसी कीं नाना रणशक्ति
वदा चोर तो कर्झन् किंवा नौरोजी सुमति
वदा चोर तो मॉण्टेग्यू कीं टिळक विपल वृत्ति
वदा चोर तो सायमन् किंवा गांधी वंद्य जगतीं
वदा चोर मी किंवा स्वारी तुमची मज पुढती

नाना आला चोर लुटारु जे कुणि हें वदती
त्यांसि विचारा प्रश्न चोर ते कोण खरे ठरती ॥८॥
'नाना आला' नाना आला-पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला
फार विरमला शरणहि आला हपिसर नानाला
पश्चात्तापें त्यानें त्याचा चरण युग्म धरिला
ह्मणे करावी क्षमा जाहला पापभार याला
पुन्हां न घेइन लांच कुणाच्या शिवेन पैशाला
मुदत सम्पतां ठेविन खालीं नोकरिचा बिला
मनांत विनविन राष्ट्र मुक्ततेस्तव त्या ईशाला
फिरविन चरखा घालिन खादी नमिल गांधीजीला
नित्य निवडुनि मागिन आयुर्दाय बहू त्याला
नाना आला-चोर नसे हा कैवारी सकलां
जो जो कोणी दुःखित त्याच्या साधिल कार्याला ॥९॥
'नाना आला' नाना आला-पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराहि सुकला

घीनो पैसो पैसानो घी करि धनमल काका
फाल्गुन शिमगा फाग चढवितो व्याज असे कैका



मारवाडी बहु करी लबाडी देई अती धोका
घरांतली हि घुसाचि समजा कीं काळा चोका
नका घाबरू नका घाबरूं हाक अशी ऐका

लिहि चोपड्या पोकळ खोट्या घे दुप्पट रोखा
महामारी कां येन अशाना कां न होई वाखा
नाना आला काळ तयांचा कपाया नाका

मुद्रक व प्रकाशक:--पी. बी. पाठक
" श्री पांडुरंग वैभव प्रेस " सुर्यमहाल मुंबई नं. ४
या पुस्तका संबंधी सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकनी ठेविलें आहेत